मागासवर्गीय मुला-मुलींसाठी सुरु करण्यात आलेल्या शासकीय वसतीगृहाच्या प्रवेशासाठी आरक्षण निश्चित करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासननिर्णय क्रमांकः बीसीएच-२०१८/प्र.क्र.३१९/शिक्षण-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२.
दिनांक - २१ डिसेंबर, २०१८

वाचा -

१. समाज कल्याण,सांस्कतिक कार्य व क्रीडा व पर्यटन विभाग शासन निर्णय क्रमांकः क्र. बीसीएच-१०८२ /९०३८५/३८/बीसीडब्ल्यु-४ , दि. १६ मे , १९८४.

२. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,शासन निर्णय क्र.खाबाप्र-२०१२/प्र.क्र.११६/शिक्षण-२/ दि.१६ मे,२०१२

३. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,शासन निर्णय क्र.बीसीएच-२०१२/प्र.क्र.११६/शिक्षण-२,/ दि.११ जुलै,२०१२

४.शासन पत्र क्र.सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,शासन निर्णय क्र.बीसीएच-२०१३/प्र.क्र.३०५/शिक्षण-२ दि.३० डिसेंबर,२०१३.

५. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,शासन निर्णय क्र.खाबाप्र-२०१२/प्र.क्र.११६/शिक्षण-२, दि. ३० जुलै,२०१४.

६. आयुक्त,समाजकल्याण,पुणे यांचे पत्र क्र.शिक्षण/शावगृ/प्रवेश/लेखाआक्षेप/बदल/२०१८/का-५/ २९२०/ दि.१०.०८.२०१८.

७. आयुक्त, समाजकल्याण,पुणे यांचे पत्र क्र.शिक्षण/शावगृ/प्रवेश/बदल/शासन निर्णय/२०१८/का-५/४४३१/ दि.०७.१२.२०१८.

सामाजिक न्याय विभागांतर्गत खालीलप्रमाणे लेखाशिर्षनिहाय शासकीय वसतीगृहे कार्यरत असून, या शासकीय वसतीगृहांमध्ये मागासवर्गीय विदयार्थ्यांना प्रवेशासाठी वेगवेगळे आरक्षण निश्चित करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | मंजूर वसतीगृह संख्या | प्रवेशासाठी आरक्षण निश्चित केलेला शासन निर्णय |
|---|---|---|---|
| १. | २२२५ ९१३ | ७२ | दि.१६ मे १९८४ |
| २. | २२२५ २८१ | १७१ | दि.१६ मे १९८४ |
| ३. | २२२५ ३३४२ (गुणवंत विदयार्थ्यां करीता) | २८ | दि.१६ मे १९८४ |
| ४. | २२२५ ३३४२ | १८३ (१२५ जयंतीनिमित्त सुरु केलेले ५० वसतीगृह धरुन) | दि.१२.५.२०१३ / दि.३० जुलै,२०१४ |

२. वर नमुद केल्याप्रमाणे जुन्या वसतीगृहांच्या प्रवेशासाठी दि.१६ मे १९८४ व नविन वसतीगृहांकरीता दि.१६ मे २०१२, दि.११ जुलै,२०१२ तसेच दि.३०.जूलै २०१४ च्या शासन निर्णयाप्रमाणे अनु.जाती प्रवर्गासाठी ८० टक्के तर अन्य प्रवर्गासाठी २० टक्के आरक्षण निश्चित करण्यात आलेले आहे.तथापि शासनपत्र दि. ३०.१२.२०१३ अन्वये जुन्या वसतीगृहांसाठी पूर्वीप्रमाणे व नविन वसतीगृहांसाठी दि.११ जूलै,२०१२ अन्वये निश्चित केलेल्या आरक्षणानुसार प्रवेश प्रक्रीया राबविण्याच्या सुचना क्षेत्रिय कार्यालयांना देण्यात आलेल्या आहेत. शासकीय वसतीगृहांसाठी नविन वसतीगृहे व जुनी वसतीगृहे असे वेगवेगळे आरक्षण निश्चित करण्यात आलेले असल्याने वसतीगृहांची प्रवेश प्रक्रीया गुंतागुंतीची झालेली असून, अशाप्रकारे शासकीय वसतीगृहांसाठी आरक्षणाची वेगवेगळी टक्केवारी लावण्यासंदर्भात महालेखापाल, नागपूर यांनी ही लेखापरिक्षणामध्ये याबाबत आक्षेप नोंदविलेला आहे.

३. सामाजिक न्याय विभागांतर्गत येणाऱ्या सर्व शासकीय वसतीगृहांच्या प्रवेशप्रक्रीयेत एकसुत्रता राहावी तसेच वसतीगृह प्रवेश प्रक्रीया सुलभ व्हावी म्हणुन वेगवेगळया शासन निर्णयाव्दारे निश्चित करण्यात आलेले वसतीगृह प्रवेशाचे आरक्षण रद्द करुन संदर्भीय अ.क्र.२ येथील दि. १६ मे २०१२ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या आरक्षण टक्केवारीची अमंलबजावणी करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. शासन निर्णय दि.१६ मे २०१२ अन्वये सामाजिक न्याय विभागांतर्गत येणाऱ्या सर्व वसतीगृहांसाठी (लेखशिर्ष २२२५ ९१३, २२२५ २८१, २२२५ ३३४२ (गुणवंत विदयार्थी), २२२५ ३३४२) खालीलप्रमाणे आरक्षण निश्चित करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | प्रवर्ग | आरक्षणाची टक्केवारी |
|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती | ८० टक्के |
| २. | अनुसूचित जमाती | ३ टक्के |
| ३. | विमुक्त जाती भटक्या जमाती | ५ टक्के |
| ४. | आर्थिकदृष्टया मागास व इतर मागास प्रवार्गासाठी | ५ टक्के |
| ५. | विशेष मागासवर्ग प्रवर्गासाठी | २ टक्के |
| ६. | अपंग | ३ टक्के |
| ७. | अनाथ | २ टक्के |
| | एकुण | १०० टक्के |

४. उपरोक्त परि. १ मध्ये नमुद लेखाशिर्षातर्गत मंजूर करण्यात आलेल्या सर्व शासकीय वसतीगृहांची प्रवेश प्रक्रीया शासन निर्णय दि. १६ मे,२०१२ अन्वये वरीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आरक्षण टक्केवारीप्रमाणे राबविण्यात यावी.

५. अनुसूचित जातीसाठी राखून ठेवलेल्या जागांपैकी महापालीका क्षेत्रात व अ-वर्ग नगरपालीका क्षेत्रात १४ टक्के जागा मांग व मेहतर जातीसाठी (मांग जातीसाठी ७ टक्के व मेहतर जातीसाठी ७ टक्के) आणि जिल्हा व

तालुकापातळींवर मांग व मेहतर जातीसाठी १० टक्के जागा (मांग जातीसाठी ५ टक्के व मेहतर जातीसाठी ५ टक्के) राखीव ठेवण्यात याव्यात.

६. शासकीय वसतिगृहाची प्रवेश प्रक्रीया राबविताना अनुसूचित जाती प्रवर्गासाठी निश्चित केलेल्या आरक्षण टक्केवारीमध्ये कोणताही बदल न करता, या जागा केवळ अनु.जाती प्रवर्गामधूनच भरण्यात याव्यात (अनुसूचित जाती प्रवर्गच्या जागा इतर प्रवर्गासाठी रूपांतरीत करता येणार नाहीत.) परंतु इतर प्रवर्गासाठी निश्चित केलेल्या २० टक्क्यामध्ये त्या प्रवर्गाचे विदयार्थी उपलब्ध न झाल्यास त्या जागा अनुसूचित जाती प्रवर्गातील विदयार्थ्यांमधून परिवर्तणाने भरता येतील.

७. यापूर्वी वसतीगृह प्रवेशासंदर्भात त्या-त्या वेळी अस्तीत्वात असलेल्या शासन निर्णयानुसार वसतिगृह प्रवेशाचे आरक्षण राहील.

८. प्रस्तुत शासन निर्णय सन २०१८-१९ पासून लागू करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८१२२७१३१७२७१३२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपालयांच्या आदेशानुसार व नावाने.

**( दि.रा.डिंगळे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव समाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय,
३. प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग (सर्व)
४. मा. मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांचे खाजगी सचिव.
५. मा. राज्यमंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांचे खाजगी सचिव.
६. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय,यांचे स्वीय सहायक
७. सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण (सर्व)
८. निवड नस्ती (शिक्षण-२)